माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील श्री.गंगाधर माणिका निरडे, शिपाई (संदेशवाहक), जिल्हा माहिती कार्यालय, परभणी यांचे अधिसंख्य पदावरील नियुक्तीचे आदेश त्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून रद्द करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र .मावज- २०२५/१५/प्र.क्र.०७/मावज-२(३४-अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक :- १४ मे, २०२६

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९.
२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्र.मावज २०१९/प्र.क्र.२१०/३४-अ, दि.०४.०२.२०२०
३) संचालक (माहिती) (प्रशासन) यांचे पत्र क्र. प्रविस्था-१०(२०२४)/ अधिसंख्य-निरडे/का-१/३८, दिनांक ०७.०१.२०२५
४) संचालक (माहिती)(प्रशासन) यांचे पत्र क्र. प्रविस्था-१०(२०२४)/ अधिसंख्य-निरडे/का-१/२६६७, दिनांक १८.११.२०२५

<u>प्रस्तावना :-</u>

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ व इतर यामध्ये दिनांक ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतची कार्यवाही संदर्भ क्र.१ दि. २१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर तरतूदीनुसार संदर्भ क्र . २ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४.०२.२०२० अन्वये माहिती जनसंपर्क महासंचालनालयातील श्री.गंगाधर माणिका निरडे, शिपाई (संदेशवाहक), यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात एक अधिसंख्य पद निर्माण करून श्री. निरडे यांची सेवा या अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.४ संचालक(माहिती)(प्रशासन) यांच्या दिनांक १८.११.२०२५ अन्वये संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, किनवट (मुख्यालय छत्रपती संभाजीनगर) यांचे पत्र जा. क्र. अभिलेख/का.९/११२१३/२०२५, दि.२८.०७.२०२५ नुसार श्री.निरडे (संदेशवाहक), यांचे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आली असून सदरचे प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात आले आहे.

उपरोक्त परिस्थीतीत श्री. निरडे यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार दि. ०४.०२.२०२० च्या आदेशान्वये अधिसंख्य पदावर वर्ग केले होते. अनसूचित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दि. २८.०७.२०२५ च्या आदेशान्वये श्री. निरडे यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरविले आहे. सबब, **<u>श्री.निरडे यांचे अधिसंख्य पदावरील नियुक्तीचे आदेश त्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून रद्द करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.</u>**

**शासन निर्णय :-**

संदर्भ क्र. १, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार दि. ०४.०२.२०२० च्या आदेशान्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील श्री.गंगाधर माणिका निरडे, शिपाई (संदेशवाहक), यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले होते. तथापि, अनुसूचित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दि. २८.०७.२०२५ च्या आदेशान्वये श्री. निरडे यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरविले असल्याने **श्री. निरडे यांचे अधिसंख्य पदावरील नियुक्तीचे दि. ०४.०२.२०२० रोजीचे आदेश हे त्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.**

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०५१४१२०६१३१९०७ असा आहे हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.05.14 12:07:41 +05'30'

**( युवराज सोरेगांवकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रती,**

१. प्रधान सचिव ( मा.व ज. )/ महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञयेता / लेखा परिक्षा ), महाराष्ट्र१ / २, मुंबई/नागपूर.
३. संचालक (माहिती) ( प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४. उपसंचालक ( लेखा ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. (मा. व ज. मार्फत)
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई. (मा. व ज. मार्फत)
७. सर्व विभागीय माहिती कार्यालय / जिल्हा माहिती कार्यालय, (मा. व ज. मार्फत)
८. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी. (मा. व ज. मार्फत)
९. सामान्य प्रशासन विभाग ( कार्यासन-१६ब ) मंत्रालय, मुंबई.
१०.वित्त विभाग ( कार्यासन आ.पु.क. )मंत्रालय, मुंबई.
११.संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना (मा.व ज. मार्फत)
१२.निवडनस्ती.